# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

**(सामान्य प्रशासन शाखा)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## जाहिर सूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/२०१८/स/२६२९ दिनांक: ४ फेब्रुवारी २०१८

## अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी आरक्षण सोडत

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४)(च),(छ),(ज) व (झ) व विद्यापीठ निदेश क्रमांक १/२०१८ मधील तरतुदीनुसार खालील सदस्य अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाचे आहेत.

| कलम | निवडून द्यावयाचे सदस्य |
|---|---|
| ३०(४)(च) | अधिसभेचे सदस्य असतील अशा, प्राचार्यांमधून अधिसभेने निवडून द्यावयाचे दोन प्राचार्य. |
| ३०(४)(छ) | अधिसभेचे सदस्य असतील अशा, अध्यापक व विद्यापीठ अध्यापक यामधून अधिसभेने निवडून द्यावयाचे, जे मान्यताप्राप्त संस्थेचे प्राचार्य किंवा संचालक नाहीत असे दोन अध्यापक. |
| ३०(४)(ज) | अधिसभेचे सदस्य असतील अशा व्यवस्थापन प्रतिनिधींमधून अधिसभेने निवडून द्यावयाच्या व्यवस्थापन प्रतिनिधींपैकी दोन प्रतिनिधी. |
| ३०(४)(झ) | अधिसभेच्या निवडून दिलेल्या नोंदणीकृत पदवीधर सदस्यांमधून अधिसभेने निवडून दिलेले दोन नोंदणीकृत पदवीधर. |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ३०(४) मध्ये सुधारणेबाबत शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक २० जानेवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १/२०१८ व पत्र क्रमांक अध्यादेश २०१७/प्र.क्र.४५८/विशि–३ नुसार वरील प्रमाणे अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांपैकी अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग प्रवर्गातील एक सदस्य निवडून द्यावयाचा आहे. त्याकरिता प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्याचा अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आला आहे.

परंतु, विद्यापीठ अधिसभेकरिता व्यवस्थापन प्रतिनिधींच्या निर्वाचकगणात राखीव प्रवगांतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील एकमेव राखीव जागा निश्चित करण्यात आली होती. त्यानुसार सदर राखीव जागेवर अनुसूचित जाती प्रवर्गातील सदस्य अधिसभेवर उपलब्ध असल्याने, अधिसभेवरून व्यवस्थापन परिषदेवर राखीव प्रवगांतर्गत निवडून द्यावयाच्या व्यवस्थापन प्रतिनिधींचा प्रारंभिक आरक्षण बिंदू विद्यापीठ निदेश क्रमांक १/२०१८ मधील अनुच्छेद बी(५) नुसार चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे निश्चित न करता **अनुसूचित जाती प्रवर्गातील आरक्षण बिंदू व्यवस्थापन प्रतिनिधींच्या निवडणूकीकरिता निश्चित करण्यात आला आहे.**

मा. कुलगुरूंना प्राप्त अधिकारांतर्गत चिठ्ठया टाकून सोडतीने आरक्षण निश्चित करण्याकरिता (अनुसूचित जाती वगळून) विद्यापीठ निदेश क्रमांक १/२०१८ मधील अनुच्छेद बी(५) नुसार कार्यवाही करण्यासाठी मा. कुलगुरूंनी **सोमवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात सभा आयोजित केली आहे.**

**संबंधित इच्छूक व्यक्ति या सभेला उपस्थित राहू शकतील.**

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)

कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे प्रमुख, संचालित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व विद्यापीठ परिसंस्थांचे सचालक.

२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित, स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्थांचे सर्व प्राचार्य/संचालक.

३. डॉ. विणा प्रकाशे, माहिती शास्त्रज्ञ (प्राध्यापक श्रेणी), राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(वसीम अहमद)
उपकुलसचिव (सा.प्र.)(अ.प्र)
व स.नि.नि. अधिकारी

NOTIFICATION-2